# वडगाव आनंद येथे 'अमृतकुंभ' जलाशयाचे उद्घाटन

। पुणे ✍ प्रतिनिधी।

जुन्नर तालुक्यानजीक वडगाव आनंद येथील 'अमृतकुंभ' जलाशयाचे उद्घाटन मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया आणि पुण्याचे जिल्हाधिकारी सौरभ राव यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.

या जलाशयाच्या स्थापनेपूर्वी या परिसरातील तीन गावांची पाण्यासाठी संपूर्ण भिस्त ही टँकरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर होती. फिनोलेक्स पाइप्सने गावकऱ्यांना भेडसावणाऱ्या या समस्येला ओळखले आणि त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला. 'अमृतकुंभ' जलाशय भरण्यासाठी कालव्यापासून २.५ किमी अंतरावर जलवाहिनी टाकण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या स्वप्नवत प्रकल्पापैकी एक असलेल्या 'जलयुक्त शिवार'मध्ये योगदानाची संधी मिळाल्याबद्दल फिनोलेक्स पाईप्सला समाधान वाटत आहे.



## ग्रामस्थांकडून कृतज्ञता व्यक्त

**या भव्य** समारंभासाठी संपूर्ण गाव मोठ्या संख्येने एकत्र आला आणि त्यांनी फिनोलेक्स आणि मुकुल माधव फाऊंडेशनच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याच प्रसंगी, मुकुल माधव फाऊंडेशनने त्याच गावातील एका जिल्हा परिषदेच्या शाळेच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदतही दिली. फिनोलेक्सचे डी. बी. वाळुंज, वैशाली देवकर, दत्ता साकोरे आणि बी. आर. मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांच्या परिश्रमामुळे हा प्रकल्प पुर्ण झाला.